म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ..................... जा. वा.
दा. क्र. 3099

वागत-गीतें व प्रासंगिक गीतें –

# गीतगुंजन

BVBK-0403011

—— सौ. मनीषा बर्वे

(सर्व हक्क लेखिके स्वाधीन)

: मुद्रक :
अंकुर आर्ट प्रिंटर्स, पंतनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०७५.

किंमत ५ रु.

प्रकाशक :
श्री. दत्ता फडणीस
'अध्यक्ष,' अटकमटक, बालनाट्य संस्था
पत्ता : १०, लक्ष्मी सदन, झवेरे रोड,
मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०० ०८०.

ग्रा.वा. ३०११ २४।१०।७४

सौ. मनिषा बर्वे

# - शुभेच्छा -

॥ श्री ॥

पी. सावळाराम
लोकेश्वरी A–(1),
नौपाडा, ठाणे.

आशीर्वाद,

सौ. मनीषा बर्वे या कवयित्रीने "गीतगुंजन" नावाचा छोटेखानी गीतसंग्रह माझ्या अवलोकनासाठी पाठवला ती गीते मी मनापासून वाचली आणि त्यांना शुभेच्छा द्याव्यात म्हणून चार शब्द लिहीत आहे.

ह्या संग्रहात प्रासंगिक स्वरुपाची गीते, स्वागत गीते आणि शारदा–गणेश मूर्तीची स्तुतिसुमने आहेतच पण त्याशिवाय भारतीय थोर नेत्यांच्या गुणगौरवाची ही गीते समाविष्ट केलेली आहेत.

रसिक वाचकांना उपयुक्त ठरावीत आणि कुठलाही समारंभ साजरा करण्यासाठी योग्य वाटावीत अशी ही सुरेख

गीते आहेत. स्वंत: त्या संगीत जाणणाऱ्या आहेत. त्यामुळे स्वररचनेचा विचार त्यांनी जरुर केला आहे. त्यामुळे राग आणि ताल या बाबतीत कुठल्याही संगीत दिग्दर्शकाला खटकणार नाहीत.

सरळ, साधी आणि सोपी गीतरचना करण्याचे कसब त्यांनी आत्मसात केले आहे. त्या यापुढे विविध विषयावर स्वतंत्र रितीने गीतरचना करतील. त्यांनी तसा प्रयत्न जरुर करावा. माझ्यासारख्या अनुभवी माणसाचा त्यांना प्रेमपूर्वक आशीर्वाद आहे. अधिक काय लिहू?

पी. सावळाराम

# * प्रास्ताविक *

प्रिय बालवाचक, शिक्षक व पालक बंधुभगिनींनो,

आपल्या सर्वांच्या सोयीसाठी खास शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांमधील महत्वाच्या गरजा लक्षात घेऊन व काही अंशी तरी त्या पूर्ण व्हाव्यात म्हणून हा अल्पसा प्रयत्न.

आपल्याला शाळांमध्ये काही विविध सांस्कृतिक उपक्रम साजरे करावे लागतात. त्यात राष्ट्रीय सण, जयंत्या, पुण्यतिथ्या व अन्य सणासमारंभाचा समावेश असतो. त्यादृष्टीने या पुस्तकात 'शालेय दिनविशेष' या सदरात ही माहिती अंतर्भूत करण्यात आली आहे. तसेच त्या उपक्रमांसाठी आवश्यक अशा माझ्या काहीं कविता योग्य चाली लावून म्हणता येण्यासारख्या आहेत. म्हणून या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत. आपल्या सेवेसाठी हीं सर्व गीते या संग्रहात एकत्रित करुन सादर केलेली आहेत.

आपणास ती आवडतील व आपण त्यांचा यथोचित उपयोग करुन आनंद मिळवाल अशी आशा आहे. आपल्या आनंदामुळे माझाही आनंद व्दिगुणीत होईल व या गीतसंग्रहाचे सार्थक होईल.

आपले सर्वांचे लाडके कवी व मला गुरुस्थानी असलेले दादा उर्फ पी. सावळाराम यांनी या छोटयाशा संग्रहाला जे आशीर्वाद दिले आहेत त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास शब्द थिटे पडतील. प्रभूरामाच्या स्पर्शाने डवलीशी खार-मुध्दा पावन झाली व तिच्या पिढयानपिढया उध्दरल्या. या 'रामाच्या' स्पर्शाने मला कवितेचा खराखुरा साक्षात्कार घडला आणि मी धन्य झाले.

माझ्या या संग्रहासाठी ज्यांनी ज्यांनी मला प्रोत्साहन देऊन अमूल्य मदत केली त्या सर्वांचे शतश: आभार मानून हे प्रास्ताविक संपवते.

आपली

**सौ. मनीषा बर्वे.**

## : अनुक्रमणिका :


| | | |
|---|---|---|
| १ | भारतीय प्रतिज्ञा | १ |
| २ | स्वागतम् सुस्वागतम् | २ |
| ३ | आम्ही बालक मान | ३ |
| ४ | सुमने घेऊन स्वागत करितो | ४ |
| ५ | शारदा स्तवन | ५ |
| ६ | सरस्वती वंदना | ६ |
| ७ | शारदा स्तवन – जय शारदे प्रिय शारदे | ७ |
| ८ | गणेशस्तवन – गजमुखा वंदन तुज करितो | ८ |
| ९ | गणेशस्तवन - मद्‌भावे आम्ही पूजन करितो | ९ |
| १० | गणेशस्तवन – येई ॐ कारा | १० |
| ११ | प्रणाम तुजला | ११ |
| १२ | जननी हुनही प्रिय आम्हाला | १२ |
| १३ | स्वतंत्रते तव स्मरण पुण्यप्रद | १३ |
| १४ | अजिक्य अमुचा राष्ट्रध्वज हा | १४ |
| १५ | दक्ष नागरिक अम्ही उद्याचे | १५ |
| १६ | ज्ञानाचा हा वसा घेऊनी | १६ |
| १७ | पुण्यस्मरण | १७ |
| १८ | मेरी झामी नही दूंगी | १८ |
| १९ | सावित्रीबाई फुले – पुण्यस्मरण | २० |
| २० | एक युगात्मा युगांतरी जो होऊनिया गेला | २१ |
| २१ | शत शत कोटी प्रणाम | २२ |
| २२ | अमर जवाहरलाल | २४ |
| २३ | स्फूर्तीदायी तव चरित्र | २५ |
| २४ | शिवछत्रपतींचा पोवाडा | २६ |
| २५ | नव्या मनूचे नव्या उषेचे | २८ |
| २६ | दहा दिशातून आशीषाक्षता | २९ |
| २७ | ज्ञानदीप चेतला | ३१ |
| २८ | शालेय दिन विशेष | ३३ |

# भारतीय प्रतिज्ञा

भारतीय जन माझे बांधव, भारत माझा देश,
परंपरा या थोर विविध, किती भाषा आणि वेश ।
पाईक त्यांचा बनेन झटूनी, कर्तव्यी विसर ना कदा,
राष्ट्रहितास्तव वाहिन निष्ठा, ज्ञानार्जन मी करीन सदा ।
सन्मानाची सौजन्याची वर्तणूक सदा देईन मी,
देशकार्य अन् समृद्धीस्तव हीच प्रतिज्ञा घेईन मी ॥

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. 3077 दिनांक २४।२।०१८
विषय बा. वा. क्र. ........
BVBK-0403011

# स्वागतम् सुस्वागतम्

(संस्कृत दिनानिमित्त खास संस्कृत गीत)

स्वागतम्, सुस्वागतम् ।
स्वाऽगतम् सुस्वागतम् ।।
आगताः आगताः आगताः सुजनाः आगताः ।
स्वागतम्, सुस्वागतम् स्वागतम्, सुस्वागतम् ।।धृ।।

सम्मीलनम् सुदिने इदम्
रसिकजनैश्च सुशोभितम्
सुखदायकं फलदायकम्
श्रीविनायकम् प्रतिवंदनम् ।।१।।

श्रीशारदां वरदायिनीं
यशदायिनीं सुफलां सदां
आवाहनम् च करोम्यहम्
यत् कार्यकाल समागतम् ।।२।।

यशः प्राप्त्यर्थमिदम् स्तवम्
यद् भाषितम्, प्रिय भाषितम्
सत्यम् शिवम् प्रस्थापितम्
गुरुणा यथा आज्ञापितम् ।।३।।

# आम्ही बालक सान

आम्ही बालक सान, गातो आम्ही गान ।।धृ।।

स्वागत करितो नववर्षाचे,
स्वागत करितो वृक्षवेलींचे,
स्वागत करितो ऋतुऋतुंचे,
करितो आम्ही प्रणाम ।।१।।

प्रिय ही भारतभू अमुची,
मंगल शुभदा ही साची,
देश भक्त अन् वीरवरांची,
हिचा अम्हा अभिमान ।।२।।

रक्षण्यास अम्ही सदा उभे,
सुभेदार छोटे अवघे,
ऐक्य शांतीच्या संदेशासह
ठेवू उंचच मान ।।३।।

# सुमने घेऊन स्वागत करितो

सुमने घेऊन स्वागत करितो, प्रीतीफुले अर्पितो ।
सस्मितवदने जोडून कर हे, गीत मधुर गातो ।।धृ।।

विद्यालंकृत आपण गुणीजन,
विशाल हृदयी प्रेमळ सज्जन,
मोदभरे आम्ही स्वागल करतो ।।१।।

तुम्हावरी असे श्रद्धा अमुची,
विविध कलागुणी प्रीती साची,
सगुणदर्शने आज आपुले मनरंजन करतो ।।२॥

तुम्ही प्रफुल्लीत आज इथे व्हा,
गुण संकीर्तनी अतीव मुग्ध व्हा,
कौतुकठेवा आपुल्यासवे आज आम्ही सेवितो ॥३॥

# शारदा स्तवन

हे शुभवदने हंसवाहिनी वंदन तुज शारदे,
कृपाप्रसादे भाग्य लाभले, आशीर्वच शुभदे ।। धृ ।।

तव वीणेने, मंत्रमुग्ध हो, पृथ्वी जल अंबर,
विवेक शुचिता हंस जगा दे, वीणा सप्तस्वर
सकलकला सद्बुद्धीदायिनी प्रसाद कर तव दे ।। १ ।।

अर्चन करितो अज्ञ बाल आम्ही, गीत दीप लावूनी,
नृत्य नाटिका तुलाच अर्पण, स्नेहे तव क्रीडनी,
तोषुन अवघ्या गीत गायनी, सफलता आम्हा दे ।। २ ।।

स्वागत करितो या सुजनांचे, काव्याची उजळो प्राची,
भावकस्तुरी गंध दरवळो, मनीषा ही अमुची,
कलाविलासे प्रमुदित होऊन आम्हा यशश्री दे ।। ३ ।।

# सरस्वती वंदना

जय शारदादेवी वंदन हे तुजला,
तोषवी प्रसादकरे स्नेहे तु सकला ॥धृ॥

भावफुले आणियली अर्पाया तुजला,
अर्चनी संतुष्ट होई, साज दे स्वराला,
बुद्धी शक्ती स्फूर्ती देई यशही या घडीला ॥१॥

मांगल्याची प्रतिमा असशी तू अतुला,
श्वेतपद्म, श्वेतवस्त्र, स्मित शोभे तुजला,
ज्ञानाचा दे प्रकाश नाशवी तिमिराला ॥२॥

भक्तीभाव घेऊनिया आले तव द्वारा,
अमृत सिंचन करुनी छेडी सुस्वराला,
आशीर्वच देई फुलवी, कविता कमलाला ॥३॥

# शारदा स्तवन जय शारदे प्रिय शारदे

जय शारदे प्रिय शारदे, अभिवंदन करिते,
दर्शन देई अम्हा झडकरी कृपा करी माते ॥धृ॥

विद्येची तू असशी देवता,
अज्ञजनांची प्रेमळ माता,
ज्ञानशलाका चेतवुनी तू नाशवी तिमिराते ॥१॥

सुस्मितवदना वागीश्वरी तू,
लोहकण अम्ही परिस स्पर्श तू,
तुझिया कोमल करस्पर्शाने जागवी बुद्धी ते. ॥२॥

उन्मेषित ही प्रतिभा कवनी,
तुझ्या कृपेने जिंकी अवनी,
कमल नयन तव उत्फुल्लीत हो अमुच्या स्नेहाते ॥३॥

# गणेश स्तवन - गजमुखा वंदन तुज करितो

प्रेमस्वरुपी, तव प्रतिमेचे पूजन हे करितो,
गजमुखा, वंदन तुज करितो ।।धृ।।

गणनायक तू बुद्धीदाता,
विघ्नविनाशक अमुचा त्राता,
विनायका तुज सदा प्रार्थितो,
अर्चन तव करितो ।।१।।

ऋद्धीसिद्धी तुजसाठी श्रमती,
संकटी जन हे तुज आळविती,
कृपादृष्टी तुझी आम्ही वांछितो,
प्रेमभरे नमितो ।।२।।

प्रथमेशा तव रूप मनोहर,
प्रेममय फिरे दृष्टी जगावर,
भक्ती प्रिती श्रद्धेने अर्पितो,
पुनरपी तुज बाहतो ।।३।।

# गणेशस्तवन - सदभावे आम्ही पूजन करितो

सद्भावे आम्ही पूजन करितो तुझेच मोरेश्वरा,
विद्यादाता तू गणनायक, नमितो ॐकारा ।।धृ।।

वक्रतुंड तू सिद्धीविनायक,
अम्ही तुझे रे अजाण बालक,

अज्ञानी अम्ही, ज्ञानवंत तू, कृपा करी ईश्वरा ।।१
गुरु अमुचा तू श्री गणेशा,
तुझिया वाचुन कुणी न त्राता,

प्रकाश ज्योती ज्ञानमार्गी तू, तूच ज्ञानतारा ।।२।।
आवाहन हे देवी सरस्वती,
कृपा करावी हे वाचस्पती,

गणराया, हे देवी शारदे, वंदन स्वीकारा ।।३।।

# गणेशस्तवन - येई ॐकारा

भावभक्तीने आज येथ आम्ही करितो जयकारा ।
गणाधिशा तू धावत येई, येई ॐकारा ।।धृ।।

अकार स्वरुपी ब्रम्हा वसतो,
उकारात विष्णूच भासतो,
मकारात तो महेश असतो,
नर्तनात अति निमग्न होऊन येई मम द्वारा ॥१॥

मांगल्याचा तू तर ईश्वर,
गणाधीपती वदती चराचर,
कृपा कटाक्ष जीवन अक्षर,
तुझ्या पूजनी समस्त गुणीजन होई तदाकारा ॥२॥

बुद्धीदाता तूच खरोखर
तुझ्या कृपेची घाली पाखर,
सुफलीत करी हे जीवन नश्वर
संस्कारित हे करुनी तन मन देई आकारा ॥३॥

# प्रणाम तुजला

प्रणाम तुजला स्वतंत्रते हा स्वीकारी अमुचा,
तुझे पुजारी ललामस्वरुपी या भारतदेशा ॥धृ॥

तुझ्याचसाठी किती वीर हे रणांगणी पडले,
टिळक, बापूजी, सुभाषबाबू तुजसाठी लढले,
मार्ग असे जरी भिन्न भिन्न तरी एकचि अभिलाषा ॥१॥

कोसळती जरी कधी तुजवरी मूर्तिमंत संकटे,
धावुनी येती रक्षणास तव जनतेचे नेते,
सुटकेसाठी होती प्रयत्ना सोडुनि जीवाशा ॥२॥

नाम न त्यांचे ठाऊक ज्यांनी प्राणार्पण केले,
तन मन धन ही तुजला ज्यांनी अपुले वाहियले,
किर्तीपताका दिगंत जावो हीच एक मनीषा ॥३॥

# जननी हुनही प्रिय आम्हाला

सस्यशामला माता ही तर, अमुची प्रिय साची
जननीहुनही प्रिय आम्हाला, जन्मभूमी अमुची ॥धृ॥

सुजला सुफला मायभू अमुची,
पाहता हिला डोळे निवती,
सुखस्वप्नांच्या हिंदोळ्यावर मने सदा झुलती ॥१॥
सुवर्णकांती मोहक कणकण,
फुका शोधिती मृगजळ वणवण,
उत्थानास्तव, उमेदीने हे हात सदा श्रमती ॥२॥

कष्टांना ना कधी घाबरती,
मानवधर्मा सदा जागती,
विज्ञानाच्या रम्य उषेची जयगीते गाती ॥३॥

इच्छित कार्या पूर्ती व्हावी,
स्वागतोत्सुका अवनी व्हावी,
नेत्रनिरांजनी हीच प्रार्थिते, सानंदे फुलती ॥४॥

# स्वतंत्रते तव स्मरण पुण्यप्रद

स्वतंत्रते तव स्मरण पुण्यप्रद, नत हे मस्तक तुजपुढती,
स्फूर्तीदायिनी यशोदायिनी, वरदायिनी तू या जगती ।।धृ।।

अभिप्सिताच्या सिद्धीसाठी प्राणाच्या उजळून ज्योती,
वीरवरांनी तुज अर्पियली त्यागमयी जीवनारती,
तात्या टोपे, झाशीवाली, वीरवर आणि सती,

जनतेतील या धुरंधराना तेज़शक्ती तू दे,
बुद्धीभ्रंश थांबवी आता तू सद्‌बुद्धी परि दे,
संधीसाधूंना सत्तांधाना अर्धचंद्र मिळू दे,

कीर्तीशलाका चेतवुनी या भारत मरु भूमिवरती,
प्रेमशांती अभिमान जागवी माते जनचित्ती ।।

# अजिंक्य अमुचा राष्ट्रध्वज हा

अजिंक्य अमुचा राष्ट्रध्वज हा अभिमानाने फडकू दे ।
शूर वीरांच्या त्यागाची ही महति जगाला दिपवू दे ।।धृ।।
ऐक्य, शांती अन् प्रीतीचा संदेश देतसे लाल,

पुण्याईसह त्यांच्या आम्ही जिंकुन घेऊ त्रिकाल,
चिरंतनातच ठेवू तेवत सत्याचीच मशाल,
सत्यशिवाचे मंगलतेचे निशाण आता फडकू दे ।।१।।

प्रिय ही अमुची भूमाता, फिका स्वर्ग हा तिजपुढती,
सत्व तिचे हे राखायाला, लावू प्राणांच्या ज्योती,
अभंग राखू शील, ब्रीद अन् धवल साजरी ही नीती,
सहकार्याची मनीषा राखू, स्नेहमोती हे विखरू दे ।।२।।

# दक्ष नागरिक अम्ही उद्याचे

दक्ष नागरिक अम्ही उद्याचे, लेणे जपू स्वातंत्र्याचे,
यश मिळवू, अभिमान जागवू, ऋण फेडू प्रिय मातेचे ।। धृ ।।

हिंदु मूस्लिम असो शीख वा, ख्रिस्ती असो कुणी बौद्ध असो,
धर्म न्याय अन् नितीसाठी, बुद्धी आमुच्या ठाई वसो,
समता राखू ममता निभवू, देऊ पांघरुण मायेचे ।।१।।

श्रद्धेने हे नमवू मस्तक, जोडू दोन्ही हात सदा,
दुष्टांना परिशासन करण्या, शस्त्राविण ना राहू कदा,
सार्थ करु ही पराक्रमाची, छत्र मस्तकी छायेचे ।।२।।

नव्या मनूचे अम्ही दूतहो, अम्ही पथिक विज्ञानाचे,
श्रमा प्रतिष्ठा मिळवून देऊ, युवक सच्छिल देशाचे,
सहकार्याचा मंत्र जपू अन् व्रतहे घेऊ सेवेचे ।।३।।

# ज्ञानाचा हा वसा घेऊनी

(गुरुपौर्णिमे निमित्त गीत)

ज्ञानाचा हा वसा घेऊनी, वाटचाल अम्ही करु ।
संस्कृतिची अन् विज्ञानाची, कास सदा अम्ही धरु ॥धृ॥

तुम्हीच अमुचे मातापिता अन् तुम्ही गुरुमाऊली,
संसारी या ज्ञानशिदोरी तुम्ही अम्हाला दिली,
हिच्याच आधारे श्रद्धेने सदा परिश्रम करु ॥१॥

ज्ञानपंढरी तुम्ही आमुची, अम्ही तर वारकरी,
ऋण हे तुमचे मस्तकी मिरवू सदा अम्ही भूवरी,
क्षमामूर्ती तुम्ही आशिष द्या हो, नतमस्तक लेकरु ॥२॥

सुकर जाहला मार्गचि अवघा, कुशलताही लाभली,
पुष्पासंगे सुगंधित अती मृत्तिकाही जाहली,
मृत्तिकेस आकारित केले, तुम्हा कधी न विस्मरु ॥३॥

# पुण्यस्मरण

**(१ ऑगस्ट टिळक पुण्यतिथी)**

लोकमान्यता मिळवून जगी जो, अमर येथ जाहला,
प्रणाम अमुचा आज प्रिय त्या थोर विभूतीला ॥धृ॥

श्रेष्ठ कार्य हे स्वतंत्रतेचे बाळकडू दिधले,
राष्ट्रासाठी देह ठेवूनी अमर जगी जाहले,
जहाल राष्ट्राभिमान स्थंडिली सदाच चेतविली ॥१॥

जग जागृतीचे बांधुन कंकण,
जगास केले जीवन अर्पण,
चंदनापरी देह झिजविला, अमरपदी पावला ॥२॥

स्फूर्तीदीप हा अखंड तेवो,
राष्ट्रपदी हे जीवन राहो,
एक मनिषा ठेवून हृदयी पूजित तत्वाला ॥३॥

# मेरी झासी नही दूंगी (राणी लक्ष्मीबाई स्मृतिदिन)

धैर्यशालिनी रणरागिणीची होती जिद्द अनिवार।
"मेरी झासी नही दूंगी" ची निनादली ललकार ॥धृ॥

इतिहासाच्या पानावरती,
सुवर्णाक्षरी हिचीच ख्याती,
झाशीच्या त्या मातीमधुनी हिचाच जयजयकार ॥१॥

तांब्यांची छोटी मनूताई,
झाली विवाहित लक्ष्मीबाई,
झाशीची परि ललाटरेखा कठोर होती फार ॥२॥

पतिची छाया नाही उरली,
पुत्रवत् प्रजे पाहू लागली,
त्रिपुरासुरमर्दिनी दुर्गेचा मूर्तिमंत अवतार ॥३॥

धूर्तांनी परी डावच रचला,
झाशी खालसा ते करण्याला,
वारसनाही म्हणून डिवचता नागिणीचा फुत्कार ॥४॥

इंग्रज सेनासागर भवती,
घाबरली ना परि मुळी ती
सेना सारी एकवटून उभी करावया प्रतिकार ५

राजनिती परी कठीण मोठी,
शक्ती पाहून युक्तीस गाठी,
पाठिशी पुत्राला बांधून घोड्यावरती स्वार ॥६॥

मजले मागून मजल मारली,
इंग्रज सेना पाठी लागली,
अखेरच्या क्षणी झाशीवालीच्या वर्मी बसला वार ॥७॥

शौर्यशाली अशी ती रणरागिणी,
बिजलीपरी भासली समरांगणी,
देहपुष्प वाहुनिया दिधला, क्रांतीला आकार ॥८॥

# सावित्रीबाई फुले - पुण्यस्मरण

**(सावित्रीबाई फुले स्मृत्ती दिन)**

क्रांतीदेवते पूज्य सती तू सावित्रीमाते,
दीपस्तंभापरी असशी तू स्त्रीउद्धाराते ।।धृ।।

ज्ञानदायिनी शक्तीदेवते,
स्फूर्तीदायिनी अज्ञजनाते
सेवेचे व्रत स्वीकारूनिया उद्धरिले शुद्राते ।।१।।

बल ही दिधले अबलांना तू,
घोर तिमिरी ज्ञान दीप तू,
उत्थानास्तव, कल्याणास्तव गिळले अपमानाते ।।२।।

पुत्रवती तू निपुत्रिका नच,
अनाथास आधार तू एकच,
मुक्तीदेवते, प्रीतीदेवते, शतकांतरी दे स्फूर्ती अम्हा ते ॥३॥

मुक्तीचा हा मार्ग दावुनी,
शब्दांना कृतिजोड देऊनी,
दास्याच्या तोडून शृंखला, दिधले सन्मानाते ॥४॥

# एक युगात्मा युगांतरी जो होऊनिया गेला-

(२ आक्टोबर गांधीजयंती)

एक युगात्मा युगांतरी जो होऊनिया गेला,
जयंतीस या वंदन करु त्या थोर विभूतीला ।।धृ।।

स्वातंत्र्यास्तव नवा मार्ग हा ज्याने अनुसरिला,
तत्त्वज्ञानापासूनि अपुल्या कधी न जो ढळला,
सत्य अहिंसा सदाचार हा त्रिगुण समन्वय केला ।।१।।

दलितोद्धारा साठी ज्याने निजतनू श्रमवियली,
जात्यधांना ज्याने आधुनिक दृष्टीही दिधली,
मानवधर्मातील एकता जनमनात रुजविली ।।२।।

शिक्षणरुपी महायज्ञ हा येथ सुरु केला,
दीपस्तंभापरी जनासि महामार्ग दाविला,
आदर्शा या ठेवुनि पुढती वंदू महात्म्याला ।।३।।

3099
28/7/01

# शत शत कोटी प्रणाम

[प्रियदर्शिनी इंदिराजींच्या चिरंतन स्मृतीस]

शक्तिशालिनी, दयामयी तू तुझा अम्हा अभिमान,
प्रियदर्शिनी इंदिरे तुला शत शत कोटी प्रणाम ॥धृ॥

जवाहराची वंशदीपिका,
तेजोमय ही ज्ञानशलाका,
मूर्तिमंत जी विजयपताका, भारतभूस ललाम ॥१॥

एकसंध या राष्ट्रासाठी,
दिली जिने आपुली आहुती,
अतीव धोरणी, राजनितीपटू, बहुजन प्रेमनिधान ॥२॥

युद्धसज्जता भारता दिली,
अण्वस्त्री सिद्धता जाहली,
विज्ञानाच्या विजयारोहणी अवकाशात प्रयाण ॥३॥

दैत्यासुर निर्दालन करण्या,
अमृतसरी ती झाली दुर्गा,
असुरमर्दिनी दुर्गेपरी धरिली ही शक्ती महान ॥४॥

'एशियाड' जगतात गाजला,
विश्वचषक राष्ट्रास लाभला,
कुशल तुझ्या त्या नेतृत्वाने भारतास बहुमान ॥५॥
रक्षक परी तो भक्षक झाला,
मातेवरी जो घाली घाला,
अतुलनीय शौर्याची पुतळी परमेश्वरी वरदान ॥६॥
पूर्णत्वा तव कार्या नेण्या,
आम्ही झटू राष्ट्रा उद्धरण्या,
स्फूर्ती देईल अम्हा सदोदित तुझेच हे बलिदान ॥७॥

# अमर जवाहर लाल

**(१४ नोव्हेंबर बालकदिना निमित्त गीत)**

स्वातंत्र्याची पहाट आली उधळीत लाल गुलाल,
भारतमाते तुला लाभला पुत्र जवाहरलाल ।।धृ।

आकांक्षाची पूर्ती झाली,
स्वतंत्रतालक्ष्मी ही आली,
तिच्या मस्तकी विराजला हा,
अमर जवाहरलाल ॥१॥

सुसंपन्न त्या गृहा त्यागिले,
राष्ट्रोद्धारा जीवन दिधले,
समतेची ही ज्योत उजळली,
सुटले पाश कराल ॥२॥

आम्ही लाडके चाचाजींचे,
फुलामुलांच्या पंडितजींचे,
बालकदिनी या वंदुन त्यांना,
बनवू हृदय विशाल ॥३॥

'शांतीच्या' त्या शुभ्र कपोता,
जिवापाड जपू आणू एकता,
सत्यशिवास्तव सुंदरतेस्तव,
श्रद्धेचीच मशाल ॥४॥

# स्फूर्तीदायी तव चरित्र -

(स्वातंत्र्यवीर सावरकर स्मृतिदिनानिमित्त)

स्फूर्तीदायी तव चरित्र, वंदनीय अम्हा अती,
दास्यातुन मुक्त केली प्रिय भूमी भारती ॥धृ॥

मृत्युंजय तुम्ही अजीत, सत्तांधा नमविले,
बंदिवासी राहुनी प्रतिभा कमला फुलविले,
स्वातंत्र्ययज्ञी स्वकुलाची दिली तुम्ही आहुती ॥१॥

अंदमानी त्या अबोल भिंती बोलू लागल्या,
तळमळ तव पाहुनी त्या लहरी हेलावल्या,
एक ध्येय, एक प्रेय, मंगलतेची ही भक्ती ॥२॥

पुण्यशील, सच्चरित्र, हिंदुनिष्ठा रक्षिली,
तत्त्वप्रिय, त्यागप्रिय, परंपरा टिकविली,
एकता, अखंडता नि समतेस्तव जागृती ॥३॥

# शिवछत्रपतींचा पोवाडा

(१ मे महाराष्ट्र दिन व १९ फेब्रुवारी शिवछत्रपती जयंती)

ऐका ऽऽऽ ऐका ऽऽऽ

ऐका तुम्हा सांगतो कथा,
थोर पराक्रमाची एक गाथा,
शिवबाच्या शौर्याची कथा,
सांगतो ऐका, सांगतो ऐका,
जी ऽऽ जी ऽ जी ऽ जी ॥

मावळ प्रांताचा शूर शिलेदार,
जिवाभावाचे मित्र केले चार,
महादेवापुढे घेतली आण,
स्वराज्याची दिली साऱ्या जाण,
मेळवून मराठे सारे, वळविले वारे, स्वराज्याचे नारे गुंजले फार॥
युक्तियुक्तिने गनिमा फसविले,
प्रांत घेतले राज्य जोडिले होऽ जीऽ जीऽ जीऽ जीऽ ॥१॥

स्वराज्याची सेवा केली फार,
जनहिताचे उघडिले दार,
गोब्राह्मण प्रतिपालन,
ब्रीद हेच होते महान,

पुण्याई जिजाईची थोर; प्रसविला पुत्र अती शूर,
शेरास जो सव्वाशेर
भल्याभल्यांची जिरविली खास
शत्रुस चारले खडे, नौबत झडे, होऽजीऽजीऽजीऽजी ॥२॥

असा राजा होता मोठा शूर
तसा दिलाचा लई दिलदार,
मावळ प्रांताचा शूर शिलेदार,
कुणा येईल ना याची सर,

अजुनही येई आठव, मर्दानी नरपुंगव, आर्जवितो तुम्हा राव,
गाऊ चरित्र त्याचे पुरे
गाऊ चरित्र त्याचे पुरे, किर्ती ना सरे कधी याची,
होऽजीऽजीऽजीऽजी ॥३॥

# नव्या मनूचे नव्या उषेचे

(विज्ञानगीत)

नव्या मनूचे, नव्या उषेचे सानंदे जयगान ।
भारतभूची शान राखूनी, उभवू उंच कमान ।।

अवकाशातील स्कायलॅबही
विज्ञानाची भरारी पाही
आव्हानांचे पेलून मेरू
राखू हिचा सन्मान ।।१।।

दहा दिशा या जवळी आल्या
क्षितीज रेखा समीप जाहल्या
संशोधन नवनवीन करण्या
झोकून देवू प्राण ।।२।।

आकाशाशी जडले नाते
सागरासही येते भरते
शक्ती समुच्चय एकवटून आम्ही
प्रगती पथी बेभान ।।३।।

# दहा दिशातून आशीवाक्षता

(१० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप)

(कर्तव्याची महती सांगणारे आशीर्वादपर सदिच्छा गीत)

दहा दिशातुन आशीवाक्षता, उधळीत आज पहा,
यशवंत व्हा, जयवंत व्हा, यशवंत व्हा तुम्ही जयवंत व्हा ।।धृ।।

सुसंस्कार जे तुम्हा लाभले,
विसरु नका ते ज्यांनी दिधले,
संस्कारातुन तेजाप्रत ही,
वाटचाल तुम्ही करा, यशाचा मार्ग खुला हा महा ।।१।।

कधी कुणा तुम्ही मुळी न दुखवा,
अमर संस्कृती अपुली दाखवा,
सत्यधर्म अन् नीतीसाठी,
बद्ध परिकर रहा, श्रद्धा चिरंतनाला वहा ।।२।।

शाळामाता हीच कस्तुरी,
सुगंधदात्री देवता खरी,
दरवळू द्या तो गंध त्रिभुवनी,
उद्यमाचिया परिसस्पर्शे फिटे मातृऋण पहा ।।३।।

दक्ष नागरीक तुम्ही उद्याचे,
सौख्य संपले बालपणांचे,
अखंड तेवत दीप राहू द्या,
कसोटीस उतरा, सुवर्णा झळाळी लाभे पहा ॥४॥

ओलांडुन हा आज उंबरा,
निघालात परी जपून उतरा,
उन्नत मस्तक सदा असू द्या,
प्रथम किरण हा कीर्तीप्रभेचा तुम्हा खुणावी पहा ॥५॥

# ज्ञानदिप चेतला

(दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभा निमित्त रचलेले गीत)

ज्ञानदीप चेतला, उजळला ज्ञान मार्ग सारा,
स्नेहसिंचने प्रकाशित करा, चराचरा सत्वरा ॥धृ॥

कष्टाविण कधी फळ ना मिळते,
विद्येविण कधी यश ना मिळते,
विद्यादाता गणाधीश त्या कधी न तुम्ही विस्मरा ॥१॥

मातापित्यांचे ऋण ना विसरा,
समाज आहे तुम्हा आसरा,
गुरुवाचुनि क्षमा नसे त्या कृतज्ञतेने स्मरा ॥२॥

घाव टाकीचे सोसुन जगती,
दगडही ते देवत्व पावती,
काटयावाचुन फुलायची प्रज्ञा न यशाकारा ॥३॥

सत्य, शिवाचे, सुंदरतेचे,
उपासक बना तुम्ही साचे,
श्रद्धेने घ्या हाती अमोलिक संस्कृतिचा हा करा ॥४॥

आशेची कधी कास न सोडा,
प्रयत्न कावड रिती न दवडा,
तुच्छ न लेखा कधी कुणाला कटू वचने आवरा ॥५॥
अभिमानाने ठेवा अविरत,
ज्ञान आणखी मानही उन्नत,
कस्तुरी गंधाचा हा ठेवा, जगतामध्ये पसरा ॥६॥
यश किर्ती सन्मान सादृशा,
पूर्णत्वाप्रत अवघ्या मनीषा,
शुभ्रवस्त्रावृता सरस्वती उभवित दोन्ही करा ॥७॥

3099 24/7/01
01·01

# - शालेय दिनविशेष -

## (शालेय दृष्टीकोनातून महत्त्वाचे असे दिवस)

### — जून —

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ६ जून | श्री. शिवछत्रपतींना राज्याभिषेक | (१६७४) |
| २ | ११ ,, | पूज्य सानेगुरुजी स्मृतिदिन | (१९५०) |
| ३ | १७ ,, | समाजसुधारक आगरकर स्मृतिदिन | (१८९५) |
| ४ | १८ ,, | रणरागिणी झाशीचीराणी लक्ष्मीबाई स्मृतिदिन | (१८५८) |
| ५ | २५ ,, | 'वंदे मातरम्' चे जनक बंकिमचंद्र चतर्जी जन्मदिन | (१८३८) |
| ६ | ३० ,, | पितामह दादाभाई नौरोजी स्मृतिदिन | (१९१७) |

### - जूलै -

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | ४ जुलै | स्वामी विवेकानंद स्मृतिदिन | (१९०२) |
| ८ | ५ ,, | आझाद हिंदसेना स्थापना दिन | (१९४३) |
| ९ | १३ ,, | रणगाजी बाजीप्रभू देशपांडे स्मृतिदिन | (१६६०) |
| १० | १४ ,, | समाजसुधारक आगरकर जन्मदिन | (१८५६) |
| ११ | १५ ,, | बालगंधर्व स्मृतिदिन | (१९६७) |
| १२ | २३ ,, | लोकमान्य टिळक जन्मदिन | (१८५६) |
| १३ | ३१ ,, | सर बेडन पॉवेल बालवीर चळवळ सुरु. | (१९०८) |

### — ऑगस्ट —

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | १ ऑगस्ट | लोकमान्य टिळकपुण्यतिथी | (१९२०) |
| १५ | ७ ,, | कवी रविंद्रनाथ टागोर स्मृतिदिन | (१९४१) |
| १६ | १३ ,, | अहिल्यादेवी होळकर स्मृतिदिन | (१७९५) |
| १७ | १५ ,, | स्वातंत्र्यदिन-(स्वातंत्र्यप्राप्ती) | (१९४७) |
| १८ | १७ ,, | क्रांतिवीर मदनलाल धिंग्रा स्मृतिदिन | (१९०९) |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | १८ ऑगस्ट | नेताजी सुभाषचंद्र बोस यानां विमान अपघात | (१९४५) |
| २० | २५ ,, | हिंदी साहित्यिक प्रेमचंद स्मृतिदिन | (१९३६) |

## - सप्टेंबर -

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५ सप्टेंबर | डॉ. राधाकृष्णन जन्मदिन | (१९६८) |
| २२ | ५ ,, | शिक्षकदिन (दरवर्षी) | |
| २३ | १४ ,, | हिंदी दिन | |
| २४ | २० ,, | डॉ. ॲनी बेझंट स्मृतिदिन | (१९३३) |
| २५ | २७ ,, | राजा राममोहन रॉय स्मृतिदिन | (१८३३) |

## — आक्टोबर —

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | २ ऑक्टोबर | म. गांधी जन्मदिन | (१८६९) |
| २७ | २ ,, | लालबहादूर शास्त्री जन्मदिन. | (१९०४) |
| २८ | ११ ,, | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मृतिदिन | (१९६८) |
| २९ | २० ,, | राष्ट्रीय एकात्मता दिन | (१९६२) |
| ३० | २४ ,, | युनो स्थापना दिन | (१९४५) |
| ३१ | ३१ ,, | इंदिरा गांधी निर्घृण हत्या | (१९८४) |

## — नोव्हेंबर —

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | ५ नोव्हेंबर | मराठी रंगभूमी दिन | |
| ३३ | ७ ,, | कवी केशवसुत स्मृतिदिन | (१९०५) |
| ३४ | ९ ,, | म. अण्णासाहेब कर्वे स्मृतिदिन | (१९६२) |
| ३५ | २७ ,, | महात्मा फुले स्मृतिदिन | (१८९०) |
| ३६ | १४ ,. | पं. जवाहरलाल नेहरु जन्मदिन | (१८८९) |
| ३७ | १९ ,, | कवी माधव ज्यूलियन स्मृतिदिन | (१९३९) |
| ३८ | २७ ,, | सेनापती बापट स्मृतिदिन | (१९६७) |

## — डिसेंबर —

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ | १ डिसेंबर | लोकशिक्षण दिन | |
| ४० | ६ ,, | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिन | (१९५६) |
| ४१ | ७ ,, | ध्वजदिन | |
| ४२ | ७ ,, | राजकवी तांबे स्मृतिदिन | (१९४१) |
| ४३ | १० ,, | मानवी हक्क दिन | |
| ४४ | २४ डिसेंबर | पूज्य सानेगुरुजी जन्मदिन | (१८९९) |
| ४५ | २५ ,, | नाताळ ख्रिस्त जयंती | |

## - जानेवारी -

| | | | |
|---|---|---|---|
| ४६ | १ जानेवारी | नववर्ष दिन (इंग्रजी कालगणनेनुसार) नवीन वर्ष प्रारंभ | |
| ४७ | १० ,, | लालबहादूर शास्त्री स्मृतिदिन | (१९६६) |
| ४८ | १२ ,, | स्वामी विवेकानंद जन्मदिन | (१८६३) |
| ४९ | १४ ,, | मकरसंक्रांत | |
| ५० | २३ ,, | नेताजी सुभाषचंद्र बोस जन्मदिन | (१८९७) |
| ५१ | २३ ,, | राम गणेश गडकरी स्मृतिदिन | (१९१९) |
| ५२ | २४ २५ २६ | शारीरिक शिक्षण दिन | |
| ५३ | २६ ,, | प्रजासत्ताक दिन | |
| ५४ | ३० ,, | म. गांधी स्मृतिदिन | (१९४८) |

## : फेब्रुवारी :

| | | | |
|---|---|---|---|
| ५५ | १७ फेब्रुवारी | स्वामी रामकृष्ण परमहंस जन्मदिन | (१८३६) |
| ५६ | १७ ,, | क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके स्मृतिदिन | (१८८३) |
| ५७ | १९ ,, | शिवजयंती (फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ | (१६३०) |
| ५८ | २२ ,, | राष्ट्रमाता कस्तुरबा स्मृतिदिन | (१९४४) |
| ५९ | २६ ,, | स्वातंत्र्यवीर सावरकर स्मृतिदिन | (१९६६) |
| ६० | २८ ,, | डॉ. राजेंद्रप्रसाद स्मृतिदिन | (१९४३) |

## - मार्च -

६१ २ मार्च भारताच्या नाइटिंगेल कवयित्री सरोजनी नायडू स्मृतिदिन (१९४९)
६२ ११ ,, संभाजी राजे स्मृतिदिन (१६८९)
६६ २३ ,, क्रांतिवीरांचे बलिदान (१९३१)

## : एप्रिल :

६४ १ एप्रिल भारतीय विमानदल दिन (१९३३)
६५ ४ ,, शिवछत्रपतींचे रायगडी निधन (१६८०)
६६ ७ ,, आरोग्यदिन
६७ १४ ,, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मदिन (१८९३)
६८ १५ ,, गुरुनानक यांचा जन्म (१४६९)

## - मे -

६९ १ मे महाराष्ट्र राज्य स्थापना (१९६०)
७० १ ,, जागतिक कामगार दिन
७१ २७ ,, पं. जवाहरलाल नेहरु स्मृतिदिन (१९६४)

## (मराठी महिन्यांप्रमाणे महत्त्वाचे दिवस)

### - चैत्र -

चैत्र शु. १ — गुडीपाडवा - नववर्षारंभ
,, ९ — रामनवमी
,, १३ — महावीर जयंती
,, १५ — हनुमान जयंती
चैत्र वद्य १३ — संत गोरा कुंभार पुण्यतिथी

### - वैशाख -

वैशाख शु. २ — शिवजयंती
,, ३ — बसवेश्वर जयंती



BVBK-0403011